असा. क्र. ८ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

बुधवार, मार्च १९, २००३/फाल्गुन २८, शके १९२४

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६.**—अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ यामध्ये महाराष्ट्र राज्यास लागू करावयाच्या आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम ... ... ... | ४५–४६ |

दिनांक ४ मार्च २००३ रोजी मा. राष्ट्रपतींनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रतिमा उमरजी,**
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६.

(मा. राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक १९ मार्च २००३ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ यामध्ये महाराष्ट्र राज्यास लागू करावयाच्या आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१९५५ चा १०. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ यामध्ये महाराष्ट्र राज्यास लागू करावयाच्या आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या त्रेपन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, अत्यावश्यक वस्तू (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २००२ असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९५५ चा अधिनियम क्रमांक १० याच्या कलम २ ची सुधारणा.

२. अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्याच्या कलम २ मध्ये,— १९५५ चा १०.

(क) खंड (एक-क) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(एक-क) "जिल्हाधिकारी" याचा अर्थ, कोणत्याही शिधावाटप क्षेत्रात त्या क्षेत्रासाठी पदनिर्देशित केलेला शिधावाटप नियंत्रक, असा आहे आणि त्यात, शिधावाटप उप नियंत्रक किंवा सहायक नियंत्रक यांचा समावेश होतो ; आणि इतरत्र त्याचा अर्थ, जिल्ह्याचा जिल्हाधिकारी, असा आहे आणि त्यात, त्याच्या संबंधित अधिकार क्षेत्रातील, अपर जिल्हाधिकारी, उप किंवा सहायक जिल्हाधिकारी, उप विभागीय अधिकारी व जिल्हा पुरवठा अधिकारी, यांचा समावेश होतो ;" ;

(ख) खंड (क-एक) वगळण्यात येईल.